## नियमित दिवाणी दावा क्र.२७२/२०२५ मधील निशाणी क्र.०५ वरील आदेश

(पारीत दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५)

सोमनाथ व इतर वि. मुख्याधिकारी नगरपरिषद अहमदपूर व इतर

**CNR NO.MHLA060010472025**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२ विरूध्द तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. अर्ज, दावा, प्रतिवादी क्र.१ यांची लेखी कैफियत निशाणी २०, प्रतिवादी क्र.२ यांची लेखी कैफियत निशाणी २३, प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांची लेखी कैफियत प्रस्तुत अर्जाचे म्हणणे म्हणून स्विकारल्याबाबत पुरसीस निशाणी २५, दोन्ही बाजूकडून दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

०३. वादीचे दाव्यातील व अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे;

वादींनी प्रस्तुत दावा हा प्रातिनिधीक स्वरूपात दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.२ चालवत असलेला व्यवसाय मिरची कांडणगृह ही आहे. प्रतिवादी क्र.२ सदरचा व्यवसाय हनुमान टेकडी, अहमदपूर येथील नगर परिषद मालमत्ता क्र.बी-६१८ या १५/१५ मिटर आकाराच्या मिळकतीमध्ये १०/१० फुट जागेमध्ये करीत आहे. ज्या जागेच्या चतुःसिमा वादी यांनी दावा परिच्छेद क्र.२ मध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.२ चालवत असलेल्या मिरची कांडण गृहाच्या दक्षिणस असलेल्या रस्त्याच्या दक्षिण बाजूस वादी क्र.१ ते ३ यांचे घर आहे. प्रतिवादी क्र.२ चालवत असलेले कांड गृह लोक वस्तीच्या मध्यभागात असून ते चालू असताना मशिनचा आवाज अत्यंत कर्कश्यपणे येतो. ज्यामुळे आजूबाजूच्या रहिवास्यांना ध्वनी प्रदुषणाचा त्रास होतो. वादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ विरूध्द प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे मिरची कांडणगृहाच्या ध्वनी प्रदुषणाबाबत दिनांक ०८.०५.२०२४ रोजी तक्रार दिली दिली होती. प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक १७.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिवादी क्र.२ हिस कांडणगृह बंद करण्याबाबत निर्देषित केले होते. असे असतानाही प्रतिवादी क्र.२ चे कांडणगृह सुरू आहे. वादी यांनी दिनांक १७.०२.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांना कायदेशिर नोटीस देऊन प्रतिवादी क्र.२ यांचे बेकादेशीर चालू असलेले मिरची कांडणगृह बंद करण्यात

यावे म्हणून नोटीस दिली होती. नोटीस मिळूनही प्रतिवादी क्र.२ यांनी मिरची कांडणगृह बंद केलेले नाही म्हणून वादीस प्रतिवादीविरूध्द कांडणगृह कायमचे बंद करण्याबाबत आदेश मिळवण्यासाठी दावा दाखल करणे भाग पडले आहे.

०४. प्रतिवादी क्र.१ यांनी दाव्यातील काही मजकूर मान्य करून काही मजकुर वादीच्या वयैक्तिक माहितीतील असल्याने त्याबाबत त्यास कल्पना नाही असा बचाव घेतला आहे.

०५. प्रतिवादी क्र.१ यांनी असे म्हणणे सादर केले की, वादीच्या तक्रारी अर्जानंतर प्रतिवादी क्र.१ यांनी रितसर चौकशी करून प्रतिवादी क्र.२ हिस मिरची कांडणगृह बंद करण्याबाबत दिनांक ०७.०५.२०२४ रोजी निर्देष दिलेले आहेत व त्या बाबत वादीस दिनांक १७.१२.२०२४ रोजी पत्रान्वये कळवले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ हीस तिच्या व्यवसायासाठी नाहारकत दिली असली तरी ती व्यवसायापासून दुसऱ्यास त्रास होणार नाही तसेच प्रदुषण होणार नाही या अटीवर दिलेली होती. तसेच भविष्यात त्याचे उल्लंघन झाले किंवा त्यापूसन शेजारील लोकांना त्रास होत असेल तर ती नाहारकत आपोआप रद्द झाल्याचे गृहीत आहे अशा स्वरूपाची होती. प्रतिवादी क्र.१ चा प्रस्तुत दाव्याशी संबंध नाही. सबब, त्यांनी दावा नामंजूर करून खर्च व नुकसान भरपाई रुपये १५,०००/- देण्याची मागणी केली.

०६. प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये ते मिरची कांडणगृह नगर परिषद मिळकत क्र.६१८ मध्ये चालवत असल्याची बाब मान्य करून उर्वरित बाबी नाकारलेल्या आहेत. त्यांनी असा बचाव घेतला की, दिनांक २०.०६.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ यांना तिने बोलावून घेऊन प्रतिवादी क्र.१ च्या सांगण्यावरून मिरची कांडणगृहाची पूर्वीची जागा बदलून तिच्या प्लॉटमध्ये दुसरीकडे ते चालू केले आहे. ज्यामुळे तिस रुपये ५०,०००/- नुकसान झाले. असे असतानाही वादीने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ ला कार्यालयाने आवाजाबाबतची पुर्ण माहिती देऊन मिरची कांडणगृह बसविण्याची परवानगी दिलेली आहे. दिवसाचा आवाज ५५ डेसीबल व रात्रीचा आवाज ४५ डेसीबलच्या आत असणे कायद्यानुसार आवश्यक आहे. प्रतिवादी चालवत असलेल्या मिरची कांडणगृहाचा आवाज हा दिवसा ५० डेसीबल व रात्री ४५ डेसीबलपेक्षा जास्त जात नाही. प्रतिवादी हिस उत्पन्नाचे

दुसरे साधन नाही. कांडणगृह व्यवसायातून तिचा चरितार्थ चालतो. वादीचे घर हे मिरची कांडण गृहापासून बऱ्याच अंतरावर आहे. कांडणगृह व वादीची मिळकत यामध्ये ३० फुट रुंदीचा रस्ता आहे व त्या रस्त्याच्या दक्षिण बाजूस वादींचे घर आहे. प्रतिवादीचे कांडणगृह हे बंदिस्त पत्रा शेडमध्ये असून ते प्रतिवादीच्या खुल्या असलेल्या प्लॉटमध्ये उत्तर बाजूकडून पुर्वेकडे तोंड करून आहे. त्यामुळे कांडणगृहाचा आवाज बाहेर येण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. प्रतिवादी यांच्या इतर शेजाऱ्यांना प्रतिवादीच्या व्यवसायापासून कसलाही त्रास नाही. वादीने केवळ प्रतिवादीस त्रास देण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा दावा केल्याने प्रतिवादीने दावा व अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०७. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांना सकृतदर्शनी केस आहे असे वादी शाबीत करतात का ? | होय. |
| २. | व्यवहार्य सोयीचे पारडे वादी यांच्या बाजुने आहे असे वादी शाबीत करतात का ? | होय. |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे असे वादी शाबीत करतात काय ? | होय. |
| ४. | काय आदेश ? | अर्ज अंतिम आदेशाप्रमाणे मंजूर करण्यात येतो. |

<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u> :-

०८. मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नोंदवण्याकरीता आवश्यक कारणमिमांसा एकच व सारखी असल्याने ती खालीलप्रमाणे एकत्रीत करण्यात येत आहे.

०९. प्रतिवादी क्र.२ यांनी तिचे कांडणगृह दावा परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये चालू स्थितीत असल्याचे त्यांच्या म्हणण्यामध्ये मान्य केलेले आहे. त्यामुळे कांडणगृह सध्या चालू स्थितीत असल्याची बाब प्रतिवादीच्यावतीने

अमान्य करण्यात आलेली नाही.

१०. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २७८ प्रमाणे सदर कायद्याखालील उपविधीनुसार दिलेल्या परवान्याशिवाय कोणताही व्यक्ती विजेचा, वाफेचा, पाण्याचा किंवा इतर यांत्रिक शक्तीचा उपयोग होणारा कारखाना चालवू शकत नाही. तसेच कलम २८० प्रमाणे कोणतीही व्यक्ती उपविधीच्या तरतूदींअन्वये देण्यात आलेल्या परवान्याच्या शर्ती व तरतुदीव्यतिरीक्त अनुसुची ७ मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनाकरीता नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही जागेचा उपयोग करू शकत नाही. अनुसुची ७ अनुक्रमांक १६ मध्ये ज्या कोणत्याही कामापासून किंवा धंद्यापासून दुर्गंध किंवा अपायकारक वास येईल किंवा ज्यामुळे आग लागण्याचा धोका संभवेल किंवा जागेचा अशारितीने उपयोग केल्याने किंवा त्याचे स्थान वैशिष्ट्यामुळे जवळपासच्या लोकांना उपद्रव होण्याचा संभव असेल असा कारखाना किंवा इतर कोणत्याही स्वरूपाची धंद्याची जागा असे नमूद आहे.

११. प्रतिवादी क्र.२ हिने नगर परिषद कार्यालय, अहमदपूर यांनी दिनांक १०.०७.२०१५ रोजी दिलेले नाहरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे. ते प्रथमतः मूळ स्वरूपात नाही. तसेच यादी निशाणी ३१ सोबत प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना त्यांनी दिनांक १७.१२.२०२४ रोजी पाठवलेले पत्र दाखल केलेले आहे. ज्यामध्ये प्रतिवादी क्र.२ चे मिरची कांडणगृह विनापरवानगी सुरू असल्याचे व प्रतिवादी क्र.२ यांनी ते तात्काळ बंद करावे असे नमूद केले आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नौकरीचे व सेवा शर्तीचे विनीयमन) नियम २०१८ अन्वये नमुना क्र.फ व ग दाखल केलेले आहेत. परंतु महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ अन्वये किंवा पोटविधी अन्वये प्रतिवादी क्र.१ कडून प्रतिवादी क्र.२ चा कारखाना चालू करण्यापूर्वी घेतलेल्या परवान्याबाबत कैफियतीमध्ये नमूद केलेले नाही. तसेच त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

१२. प्रतिवादी क्र.२ करत असलेला व्यवसाय मिरची कांडणगृह यामध्ये उत्पादन होत असल्याने व त्यामध्ये असलेल्या मशीनसाठी विजेची आवश्यकता

असल्याने तसेच त्यामध्ये उत्पादित होत असलेले उत्पादन वायू प्रदुषण व त्याद्वारे सर्वजनीक आरोग्यास उपद्रव करणारे आहे. सबब, तो व्यवसाय चालू करण्यापूर्वी प्रतिवादी क्र.२ हिस महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम २७८ किंवा २८० अन्वये पोटविधी नियमाप्रमाणे परवाना घेणे आवश्यक होते. जो घेतलेला आहे असे प्रतिवादी क्र.२ ने अभिलेखावर आणलेले नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक १०.०७.२०१५ रोजी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्रावरून प्रतिवादी क्र.२ चालवत असलेला मिरची कांडणगृह हा व्यवसाय कायदेशीर आहे असे प्राथमिकदृष्ट्या सिध्द होत नाही. या कारणास्तव वादीस प्रथमदर्शनी केस आहे असे म्हणता येईल.

१३. मिरची कांडणगृह हा व्यवसाय ध्वनी व वायू प्रदुषण निर्मित करणारा आहे. त्यापासून सार्वजनिक हानी निर्माण होऊ शकते. सबब, व्यवहार्य सोयीचे पारडे वादीच्या बाजूने झुकते. वादीने हनुमान टेकडी अहमदपूर या भागात रहिवास करणाऱ्या इतर रहिवासी यांना त्रास होत असल्याबाबत यादी निशाणी २७ कडे दशरथ शंकर लोकरे व चंद्रकांत माणिकराव सोनकांबळे यांचे शपथपत्र दाखल केलेले आहेत. ज्यावरून प्रतिवादी क्र.२ च्या व्यवसायामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येण्याचा संभव वाटतो. सार्वजनिक आरोग्य धोक्यात येणे ही बाब आतोनात नुकसान करणारी असू शकते. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष सकारात्म नोंदवणे न्यायाचे आहे. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर सकारात्मक नोंदवीत आहे.

मुद्दा क्र.४ करीता :-

१४. मुद्दा क्र.१ ते ३ च्या सकारात्मक निष्कर्षाच्या अनुषंगाने अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करते.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो दावा परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद म्हणजेच नगर परिषद मालमत्ता क्र.६१८ अहमदपूर येथील मिळकतीमध्ये त्यांचे चालू मिरची

कांडणगृह चालू ठेवू नये अशी तुर्तातुर्त मनाई देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ठ करण्यात यावा.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.10.06 13:54:58 +0530

दिनांक :- ०१.१०.२०२५

(स्वानंदी दे. वडगांवकर )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अहमदपूर